तेलाचा भाव काय? आठवा मणि

मी एकच व्यक्ती नव्हतो जो ईश्वराची करुणा भाकत होतो. याच वेळी कोपऱ्यावरच्या घरात आजीसारखी दिसणारी एक म्हातारी बाई टीनाच्या पत्र्यावर थबाथबा नाचत आकाशाकडे आपले सुरकुतलेले, किडमिडे भुंडे हात फैलाऊन कृष्णाला बेंबीच्या देठापासून हाका मारीत होती. अरे क्रूष्णा, अरे क्रूष्णा काय रे छळतो मला, तुझ्या विना कोण वाचवील मला माझ्या संकटातून? येरे बाळक्रूष्णा घाल धाव.

म्हातारी बाई म्हणजे दुर्पताबाई, खंडू कल्हैकराची आऊ, आणि धोंडुची आई. पत्र्यावर तिने पोतंभर चिमणसाळ तांदूळ वाळत घातले होते. तिच्या माहेरी तांदळाची शेती होती. भावंडे मोठ्या प्रेमाने तिला घरचा वाण धाडीत. चिमणसाळ तांदूळ हा त्या रेशनच्या दिवसात सोन्याच्या भावाने देखील बाजारात मिळत नसे. दुर्पताबाई (सभ्य शब्दात द्रौपदीबाई) आपल्या गल्लीतल्या गल्लीत या तांदूळाचे भांडवल करून संसाराला पै पैशाची मदत करून हातभार लावायची. आमच्या घरात सदोदित श्राद्ध पक्षादि कार्ये चालायची. मग आजी आपला वशीला लाऊन दुर्पताबाईकडून तो दिवस फिटेल एवढे चिमणसाळ तादूळ आपल्या ओच्यात घालून यायची. चिमणसाळ तांदूळ ज्यांनी बघितला नाही त्याला हे प्रकरण कळणार नाही.

पांढरा शुभ्र लांब दाण्याचा व अतोनात सुवास असलेला हा तांदूळ बासमतीच्या तोंडात मारील. दुर्पताबाईच्या नुसते दारावरून जर एखादा ब्राम्हण जात असेल तर त्याची पावले मंद पडायला लागयची, नाकपुड्या फुर्फुरायला लागायच्या तोंडाला जीवंत झरा फुटावा असे पाणी यायला लागायचे, त्याच्या गरगरीत पोटात कावळे कोकायला लागायचे, थोडक्यात त्या ब्राम्हणाचा जीव घायकुतीस यायचा. असा तो अद्वितीय तांदूळ पत्र्यावर घालून दुर्पताबाई डुलक्या घेत होती. माझी आजी अगदी असेच करायची बोलता बोलता तिची ब्रह्मानंदि टाळी लागायची. पावसाच्या धारांनी धरलेला सूर हा जणुकाय दुर्पताबाईला अंगाईसारखा भासून झोपेच्या गुलगुलीत गादीवर तण्णावून देत होता. साऱ्या वर्षाची कमाई तिच्या अंधुक डोळ्यासमोर वाहून गेली होती.

मी मनात प्रार्थना केली होती पण दुर्पताबाई मोठ्याने आक्रोश करून यच्चयावत पृथ्वीला उठवत होती. चला माझ्या अन् दुर्पताबाईच्या हाकेला प्रत्यक्ष श्रीकृष्ण येत आहे यातच मला समाधान होते.

Sid Harthचिमणसाळ तांदूळाचा वास केवळ पिंगुळाचा वासच मारील.